*"यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?"*

# पुरुषोत्तम युगपुरुष पं. भास्कर रघुनाथ बखले

**जन्म :** दिनांक १७.१०.१८६९ - मुक्काम - कठोर, जिल्हा सुरत (गुजराथ राज्य)

**मृत्यू :** दिनांक ०८.०४.१९२२ - पुणे

शतकातून एखाद्यानेच असे जन्माला यावे आणि स्वतःचे असे कार्यक्षेत्र निवडावे की त्या कार्यक्षेत्रामधे पुढच्या शतकामधे त्याचेच नाव आदराने घेतले जावे; तशी व्यक्ती तीच म्हणून ! मोरोपंत पराडकरांच्या भाषेत सांगायचे तर ।।"झाले बहु; होतील बहु, आहेतही बहु, परंतु यासम हा"।।

संगीताच्या क्षेत्रामधे अनेकांच्या रंजनाची गंगोत्री जिथे आणि ज्यांचेमुळे सुरू झाली; ज्यांची हुकमी तानांची बरसात प्रतिक्षणी नव-नवीनच वाटत असे; ज्यांचा प्रत्येक कार्यक्रम संस्मरणीय ठरत असे; ज्यांची लयबद्धता आणि तालाची बंदिस्ती कधीही ढळत नसे. संगीतविद्येचे मर्मज्ञ, ख्यातकीर्त, कलाविद् गोविंदराव टेंब्ये यांच्या भाषेत सांगायचे तर; "आलापाचे सौंदर्य, गळ्याची माधुरी, स्वरांचा जिवंतपणा, रागाचा सच्चेपणा, तालाचे लालित्य हे सर्व गुण, सारख्या उत्कर्षाला ज्यांचेमधे पोहोचलेले दिसले असा, गुरुवर्य भास्करराव बखले यांचेसारखा गायक शतकातून एखादाच जन्माला येतो!

भारतीयांचे आत्मभान जागृत करणारे बाळशास्त्री जांभेकर, काव्याची रमणीयता प्रचितीमधे आणून देणारे मोरोपंत पराडकर किंवा भास्कर रामचंद्र तांबे तसेच सुरेश भट, सुधीर मोघे, प्रसंगी रण-रागिणी दुर्गा होऊन शौर्याचा आदर्श निर्माण करणारी लक्ष्मीबाई नेवाळकर, प्राचीन ज्ञानभांडार सर्वसामान्यांसाठी खुले करणारे पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर, अवकाशाचा वेध घेणारे जयंतराव नारळीकर, पत्रकारांतले आदर्श - बाबुराव पराडकर, देउस्कर, ल. ना. गर्दे, गोविंदराव तळवलकर, प्रभाकर पाध्ये, ह. रा. महाजनी, पतंजलीच्या योगविद्येची मूर्ती वासुदेवानंद सरस्वती टेंब्ये स्वामी महाराज, पुरोहित स्वामी, नाटेकर महाराज, पंथ संस्थापक स्वामी चक्रधर, पेटीवादनाचा आदर्श गोविंदराव टेंब्ये, आयुर्वेदाचे आधारस्तंभ - सांडू, पुराणिक, नानल, पाध्ये, गुणे, विमा कंपनी व बँकिंगची मुहूर्तमेढ रोवणारे अण्णासाहेब चिरमुले, समाज नेहमीकरिताच जागृत अवस्थेत रहावा, कधीही ढेपाळू नये यासाठी समर्पित वृत्तीने देशसेवा करण्याचे व्रत घेतलेले लक्षावधी व्रती स्वयंसेवक, स्वकीयांचाच विरोध असतानाही सतत निर्माण करीत राहणारे पूज्य श्री. माधवराव गोळवलकर गुरुजी, ख्यातनाम गणिती रँग्लर महाजनी, रँग्लर नारळीकर कुटुंब, आधुनिक काळातला कर्ण मनूकाका पंडित, सूक्ष्म ताल-विद्येचा मुकुटमणी सुरेशराव तळवलकर, प्रसंगी पंतप्रधानांनाही ठणकावणारे पहिले सभापती ग. वा. मावळंकर, दोन मोठ्या राज्यांचे मुख्यमंत्री असलेले श्री. बाळासाहेब खेर आणि गोविंद वल्लभपंत पराडकर, संस्कृतीच्या पाउलखुणा जपणाऱ्या विदुषी दुर्गा भागवत, 'धर्मसिंधू'सारखा ग्रंथ लिहून धर्मशास्त्राविषयी निर्णय देणारे पं. बाबाभट्ट पाध्ये, मराठी इतिहसाचा पाया घालणे गोविंदराव सरदेसाई, त्र्यंबक भास्कर शेजवळ ..... स्वनामधन्य अशा प्रातःस्मरणीय गुणवंतांची मांदियाळी सतत निर्माण करणाऱ्या आपल्या या 'कऱ्हाडा' समाजातील सूर्य-चंद्रांची किती-किती नावे घेऊ? याच आपल्या कऱ्हाडा ब्राह्मण समाजामधे संगीताच्या क्षेत्रातला पहिला स्वरभास्कर, स्वयंभू कलाकार, देवगंधर्व, रससिद्ध

पंडित, अप्रतिहतरथ, आग्रा-ग्वाल्हेर-जयपूर या संगीताच्या तीनही घराण्यांचा प्रीतिसंगम ज्या व्यक्तिमत्त्वात झाला होता आणि जो कोणत्याही देशात शे-सव्वाशे वर्षातून एखादाच पहायला-ऐकायला मिळावा असे पंडितश्रेष्ठ - पुरुषोत्तम बखले नावाचे स्वयंभू तेजाचा परिचय घडवून देणारे, युगपुरुष म्हणून ठरलेले एक **महारत्न** निर्माण झाले.

बडोद्याच्या नवकोट-नारायण म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री. मैराळशेठ (तथा जांभेकर) यांच्या वाड्यामध्ये बिऱ्हाड करून राहिलेल्या बखले-बुवांजवळ ग्वाल्हेर घराण्याच्या फैज महंमदखाँकडून, जयपूर घराण्याच्या अल्लादियाँखाँ-कडून, आणि आग्रा घराण्याच्या नत्थनखाँकडून कष्टाने संपादन केलेली तीन गायकी-शैलींची श्रीमंती होती. किर्लोस्कर कंपनीच्या श्री. बाळकोबा नाटेकरांना बखलेबुवा आपले चौथे गुरू असे मानीत असत. एवढे असूनही त्यांची गायकी स्वतंत्रच होती.

मराठी रंगभूमीला तीन व्यक्तींनी दिलेले योगदान फारच महत्त्वाचे आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर, भालचंद्र पेंढारकर आणि प्रभाकर पणशीकर! यांतल्या श्री. अण्णासाहेब किर्लोस्करांना मराठी संगीत रंगभूमीचे विश्वकर्मा म्हणून ओळखले जाते. (जन्म ३१.३.१८४३) यांनी पुण्यामधे बुधवार पेठेतल्या आनंदोद्भव नाट्यगृहामधे दि. ३१.१०.१८८० यादिवशी मराठीतील 'संगीत शाकुंतल' या नाटकाचा पहिला मराठी प्रयोग लोकांसमोर केला. किर्लोस्करांनी भाऊराव कोल्हटकर, मोरोबा वाघोलीकर यांच्या साथीने किर्लोस्कर नाटक कंपनी स्थापन केली. कोल्हटकरांनी बडोद्याहून बखलेंना कंपनीत आणले. त्यांच्या 'रामराज्य वियोग' या नाटकात, कैकयीचे काम भास्करबुवा करीत असत. वीस रुपये पगार होता. पुढे अण्णासाहेब किर्लोस्कर अकाली निवर्तले. भास्करबुवांचा आवाज फुटला. त्यामुळे मॅनेजर साठे व कोल्हटकर नाराज होते. कोल्हटकरांच्या अपमानास्पद बोलण्यामुळे बखलेंनी कंपनी सोडली व ते परत बडोद्याला गेले.

बडोद्याचे न्यायाधीश बाळशास्त्री तेलंग, यांनी बखले यांना फैज महंमदांकडे नेले. त्यांचा शागीर्द बनून, त्यांच्या घरी हरतऱ्हेची कामे करून विद्यासंपादनाचे कार्य केले. सर्व अडथळ्यांवर मात करून, भास्करबुवा तिन्ही गुरूंचे आवडते शिष्य झाले.

सातारच्या वेणू रामचंद्र देवस्थळी या मुलीशी विवाहित झाले आणि परत मुंबईकडे आले ते प्रसिद्धीला पावलेले एक दमदार, लय-ताल-स्वरांमध्ये पक्के आणि मूळचाच प्रौढगंधर्वांचा 'स्वर्गीय' आवाज लाभलेले गवई म्हणून! मुंबईमधे त्यावेळी तेलंग बंधू आणि बडोदा राज्याचे सरसुभे श्री. गजाननराव भाटवडेकर यांचे बंधू श्री. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर हे ख्यातनाम व्यक्तिमत्त्व होते. या सर्वांवर भास्कररावांच्या गायनाचा जादूसारखा प्रभाव होता. त्यामुळे प्रतिष्ठितांच्या सभांमधे भास्कररावांना निमंत्रणे येऊ लागली आणि लवकरच दमदार-लयबद्ध-मधुर गळ्याची तसेच सच्चा स्वरांची छाप पाडणाऱ्या आणि मोहिनी घालणाऱ्या, गायकीची स्वतंत्र शैली असलेला उत्तम गवई अशा भास्करबुवांची सर्वतोमुखी ओळख झाली.

धारवाड, मुंबई, बडोदा, उज्जैन, इंदोर, ग्वाल्हेर ते जालंधरपर्यंत बुवांना मैफिलींची आमंत्रणे येऊ लागली. त्यांच्या गायनाच्या शैलीवर लुब्ध होऊन अनेकांनी त्यांची शागिर्दी स्वीकारली. दरम्यान जयपूर घराण्याचे संगीत सम्राट अल्लादियाखाँ हे बुवांचे गुरूही कोल्हापूरचे दरबारी गवई झाले होते. मुंबई-कोल्हापूर-धारवाड ही सर्व दक्षिणेतली केंद्रे गायनासाठीही मशहूर झाली. बखलेबुवांनी अनेक नामांकित शिष्य तयार केले.

ताराबाई शिरोडकर, केसरबाई केरकर, राजाभाऊ फुलंब्रीकर, बालगंधर्व, मणेरीकर, पित्रे, दिलीपचंद वेदी, बापूसाहेब केतकर, गोविंदराव टेंबे यांसारखे त्यांनी निर्माण केलेले शिष्य बखलेबुवांची लोकप्रियता अधिकाधिक वाढवीत होते. बुवांचा सर्वात जास्त सहवास गोविंदराव टेंबे यांनाच मिळाला. १९०४ मध्ये बुवांनी पुण्याला बिऱ्हाड केले. जालंधरच्या हरिवल्लभ मेळाव्यासाठी बखलेबुवांना दरवर्षी प्रमुख गवयाचा मान देऊन बोलावण्यात येत असे. अशा ठिकाणी ते शिष्यांसह जात असत.

आरंभी किर्लोस्कर नाटक मंडळीतली नवीन गायक मुले गांधर्व महाविद्यालयामधे गायनकला शिकायला जात असत. पं. विष्णु दिगंबर पलुस्करांनी रंगभूमीवरचे गायक शास्त्राची बूज राखत नाहीत अशी टीका करत किर्लोस्कर कंपनीच्या नानासाहेब जोगळेकरांच्या गाण्याची खिल्ली उडवली. हे सहन न झाल्यामुळे भास्कररावांच्या साह्याने, जोगळेकरांनी गायनाचे शिक्षण देण्यासाठी 'किर्लोस्कर भारत गायन समाज' ही संस्था गायनाचे शिक्षण देण्यासाठी निर्माण केली. या संस्थेचे नाव 'भास्कर संगीत विद्यालय' असेच ठेवायचे होते. परंतु बखलेबुवांच्याच आग्रहामुळे अण्णासाहेब किर्लोस्करांची स्मृती म्हणून संस्था उभी राहिली. कालांतराने त्यातल्या 'किर्लोस्कर' या नावाचा लोप झाला आणि आज 'भारत गायन समाज' नावाची संस्था पुण्यात आहे.

भास्करबुवा बखले यांच्या गायनाची वैशिष्ट्ये, त्यांचे गुण, त्यांची साधना, त्यांचे सन्मान, त्यांनी तयार केलेले अनेक स्वनामधन्य शिष्य, यासंबंधीची सविस्तर माहिती भास्करबुवांच्या नातसून सौ. शैला दातार (माहेरच्या शैला सरदेसाई) यांनी परिश्रमपूर्वक लिहिलेल्या 'देवगंधर्व' या बखलेबुवांच्या चरित्रामधे दिलेली आहे. या लेखासाठी त्यातील माहितीचा आधार घेतलेला आहे. पु. ल. देशपांडे यांनीही बखलेबुवांच्या गुणांबद्दल भरभरून लिहिले आहे. अनेक नामवंतांनी त्यांचेवर, त्यांच्या गाण्याच्या शैलीवर भरभरून लिहिले आहे. भारतीय शास्त्रीय संगीताचा पहिला स्वर-भास्कर अस्ताला गेला तरी त्यांचे गुण जाणणाऱ्या अनेकांनी द्वेषबुद्धीला सोडून त्यांचेबद्दल जे लिहिले ते वाचण्यासारखे आहे. अशा लिखाणाचा उद्देश, अशा स्वयंभू गुणविशेष धारण करणाऱ्या महनीय व्यक्तिमत्त्वांचे ते सद्‌गुण कळावेत, हाच असतो. आपण ते सद्‌गुण पाहू. सभोवताली, प्रतिकूल परिस्थितीचे जहाल विषांचे साम्राज्य असतानाही, स्वतःची स्वयंभू गुणवत्ता, नेहमीकरिता वर्धिष्णू ठेवणाऱ्या, आपल्या समाजाची त्यामुळेच मोठी सेवा होईल.

**बालगंधर्व** - 'अवतारी पुरुष होते'. **दिलीपचंद वेदी** - अनेक रागांमधे नव्या चिजा बांधून त्यामधे हे भास्करबुवांची प्रशंसा करीत असत. पंजाबी रसिकांचे बुवांसंबधीचे मत ते सांगत - 'ऐसा गवैय्या कोई नही है, न हिंदुओं मे न मुसलमानों मे'. महाराष्ट्राने त्यांची जेवढी कदर करायला हवी होती तेवढी केली नाही असं ते म्हणत. **शंकरराव गायकवाड** - 'एवढा समर्थ गाणारा हिंदुंमधे दुसरा गायक नाही'. **फैयाज खाँ** - 'हिंदुओं मे क्या बाकी मुसलमानों मे भी ऐसा गवैय्या नही हुआ ।' **भार्गवराम आचरेकर** - 'त्यांची मैफल पडली असे कधी झाली नाही'. **जितेंद्र अभिषेकी** - 'भास्करबुवांनी चाली दिल्या नसत्या तर मराठी नाट्यसंगीत म्हणून जो काही प्रकार आहे तो मराठी किंवा हिंदुस्थानी स्टेजवर आलाही नसता'. **मधुसूदन कानेटकर** - 'स्वर-लय-उच्चार-गती हे नाट्यसंगीताचे चारही महत्त्वाचे घटक त्यांनी प्रत्यक्षात आणले'. **केसरबाई केरकर** - 'गायनातला पुरुषोत्तम होते'. पुण्यातले ख्यातनाम संगीत-विद्या गुरू **श्री. गोविंदराव देसाई** - 'त्यांचे गायन ऐकून घमेंड, दुष्टपणा, हेवा, ईर्षा,

निंदा इत्यादी विकार नाहीसे होत असत'. **मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर** – 'त्यांच्या रुपयातला पैसा माझ्यात आहे'. **पं. रामकृष्णबुवा वझे** – 'भास्करबुवांसारखा सर्वांगसुंदर, प्रेमळ, आपल्या मोहक तेजदार गायकीने अथपासून इतिपर्यंत मैफल किंवा श्रोतृवृंद डोलविणारा किंवा रमविणारा गायक आपल्या पाहण्यात विरळा ....'. **न. चिं. केळकर** (मु.पोष्ट पुणे) – 'सुरुवातीला त्यांचा आवाज तितकासा गोड वाटला नाही. पं. विष्णुबुवा पलुस्कर यांच्यासारखी घटना शक्ती (संस्था काढणे वगैरे) भास्करबुवांपाशी नव्हती. त्यामुळे स्थायी संस्था काढून शिष्यवर्गाचे जाळे – अनेक ठिकाणी शाखा पसरविता आल्या नाहीत. नामवंत असा एकच शिष्य मागे ठेवला तो म्हणजे मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर!'. परंतु पुण्याचे असूनही **वसंतराव देशपांडे** म्हणतात – 'ज्यांचे, बोटावर मोजण्याइतके शिष्यदेखील युगपुरुष ठरावेत; अशा गुरूचे मोठेपण फक्त भास्करबुवांकडे जाते. खऱ्या अर्थाने भास्करराव स्वयंभू होते. एका स्वतंत्र गायकीचे ते निर्माते ठरले'. मत्सर किंवा असूयेचा पूर्ण अभाव आणि जातीचा अभिनिवेश नसलेल्या तेवढ्याच प्रसिद्ध आणि गायनविद्येतील जाणकार व्यक्तीचे हे मत विद्वानांना ग्राह्य वाटेल. पं. भास्करराव बखलेबुवांना निस्तेज करण्याच्या बुद्धीने लडबडलेले जे कौतुक केळकरांनी पलुस्करांचे केले; त्यांचेविषयी व त्यांच्या गांधर्व संगीत महाविद्यालयाची व त्यांच्या शाळांतून तयार झालेल्या नामवंतांची जणू हजेरी घेणारी वस्तुस्थिती मांडतांना ख्यातनाम विचारवंत पु. ल. देशपांडे, विष्णु दिगंबर पलुस्कर यांचेवरच्या त्यांच्या लेखामधे म्हणतात – त्यांच्या (पलुस्करांच्या) बहुतेक शिष्यांची विचारशक्तीही गायकीइतकीच बोथट. संगीताच्या नीरस पाठ्यपुस्तकांमधे भर घालण्यापलीकडे आणि पदव्यांचे घाउक वितरण करण्यापलीकडे त्यांचे हातून फारसे कार्य झाले नाही. मैफिलीत आनंदाची बरसात करणारे गायक वादक आपण का निर्माण करू शकलो नाही? याची खंतही वाटू नये अशी एक आत्मसंतुष्ट वृत्ती गांधर्व महाविद्यालयात आढळते ... 'आजही संगीत विद्यालयातून रागांचे पठण होते. पचन होते का नाही हे कोणी पहात नाही' ... 'पं. शरदचंद्र आरोलकरांच्या मांडणीत जी सहजता आढळली, ती पं. विष्णू दिगंबरांच्या शिष्यात दिसत नाही. स्पष्टच सांगायचे म्हणजे ही गायकी (पलुस्करांची) सौंदर्यहीन वाटते' ..... 'त्यामुळे कलावंत म्हणून पं. भास्करबुवा बखले यांनी गायकीत जी चैन पैदा केली ती पं. विष्णुबुवांनी टाळली असावी, अशी शंका येते; म्हणूनच भास्करबुवांच्या गायकीचा परिणाम झालेले मास्टर कृष्णराव, बालगंधर्व किंवा गोविंदराव टेंबे यांच्या कलेत जाणत्या आणि नेणत्या श्रोत्यांना आल्हाद देण्याचे सामर्थ्य दिसून आले .... 'एखाद्या संताप्रमाणे अभिजात संगीताचा ठेवा नाटकातल्या पदातून सुलभ करून मराठी सामान्य रसिकांना पं. भास्करबुवा बखलेंनी दिला.' ... 'आज आपल्या गायनकलेचा हजारो कानसेनांवर प्रभाव पाडणाऱ्या कुमारगंधर्व, जसराज, किशोरी आमोणकर, भीमसेन जोशी, वसंतराव देशपांडे, माणिक वर्मा, प्रभा अत्रे यांच्या बरोबरीने मान्यता पावलेल्या गांधर्व विद्यालयाचा कोणी गायक किंवा गायिका आढळत नाही. संगीत विद्यालयांच्या या अशा म्युनिसिपालिटीच्या शाळा का व्हाव्यात ? या प्रश्नाचे मुख्य उत्तर हेच की घाउक प्रमाणात उत्पादन सुरू झाले की कस रहात नाही! (पहा 'मैत्र' श्री. पु. ल. देशपांडे यांचा लेखसंग्रह – आवृत्ती दुसरी १९९५)

पलुस्करांशी खोटी-खोटी तुलना करून पं. भास्करबुवा बखले यांना एक सर्वसामान्य गायक ठरविणाऱ्या श्री. न. चिं. केळकर या नामांकिताने लिहिलेल्या अभिनिवेशपूर्ण पण मत्सरी वृत्तीला गायन-विद्येचे मान्यवर विचारवंत व चिंतनशील अभ्यासक पु. ल. देशपांडे यांनी दिलेले अभ्यासपूर्ण वस्तुस्थिती दाखविणारे उत्तर आणि

त्यांचे याबाबतीतले विचार, स्वभावोक्ती अलंकारासारखे मनोहारीच आहेत. पं. पलुस्कर यांचेवर त्यांनी लिहिलेल्या लेखातलेच हे विचार आहेत; हा त्यांचा आणखी विशेष. देशपांडे भास्करबुवांच्या जातीचेही नाहीत.

आपल्या स्वयंभू गुणांमुळेच सर्वापलीकडे जाऊन मूर्धन्य स्थान पटकावणाऱ्या आणि अशी व्यक्ती स्वजातीय नसेल आणि ती संख्येने खूप छोटी, बखले, खेर, मावळंकर, पणशीकरसारख्या आडनावांची असेल तर त्यांचे कार्य क्षुल्लक लेखून त्यांना क्षुद्र ठरविण्याचा काही लोकांचा उद्योग नेहमीच चालू असतो. समाजसेवक पु. पां. गोखले (कराड) यांनी पं. सातवळेकरांच्या चरित्रामधे 'गणेश वासुदेव टेंब्ये स्वामी **याने** चार पुस्तके लिहिली' असे खासे वाक्य टाकले आहे.

श्री. गुळवणी महाराजांच्या पुण्यातील आश्रमाने प्रसिद्ध केलेली पूज्य श्री. टेंब्ये स्वामींच्या पुस्तकांची संख्या पंचवीसच्या वर आहे; आणि त्यांची पानेच पाच हजारच्या आसपास आहेत. असे असतानाही दडपून खोटे लिहिण्याकरिता कुसंस्कारित अहंकाराची श्रेणी व पातळी मोठी असावी लागते. अशा पूज्य - मान्यवर लोकांचा अनादरदर्शक एकवचनी उल्लेख; अशा स्वयंमन्यांचे खोट्या अहंकाराचे दागिने मिरवणाऱ्या समाजात तथाकथित मोठेपण वाढवितो. मग तो श्री. शंकर अभ्यंकरांचा एखादा ग्रंथ असो वा का. श्री. नेनेकृत काका पुराणिकांचे चरित्र असो.

या अशा कुत्सित बुद्धीचा तसेच दांभिकता आणि मानित्व या गुणधर्मांचा प्रभाव आपल्यावर पडूं न देण्यात, आपले वेगळेपण कऱ्हाडा मंडळींनी जोपासलेले आहे. ते तसेच टिकावे एवढीच अपेक्षा! अन्यथा एखादे पु. ल. देशपांडे यांचेसारखे मान्यवरोत्तम व्यक्तिमत्त्व या हलक्या मनोवृत्तीची अशी हजेरी घेत असते आणि व्यक्तीचे काळेकुट्ट अंतःकरण नेहमीकरिता प्रदर्शनीय वस्तू ठरते!

ही अशीच मानसिकता पं. भीमसेन जोशी निवर्तल्यानंतर प्रकट बोलते, 'संगीताच्या दुनियेत स्वरभास्कर एकच झाला' ... हेतू .... सांगायला नकोत. मात्र महाराष्ट्र टाइम्सने योग्य शीर्षक दिले, 'संगीत-सूर्याचा अस्त!' पं. भास्करबुवांच्या दैवी गुणांना सहस्र प्रणाम!

**अवधूत हर्डीकर**
१६ए, गणेशकृपा सोसायटी,
परमहंसनगर, पौड रोड,
पुणे ४११०३८